# शिवाजी विद्यापीठ राज्यात अव्वल

## नॅक मानांकन : ३.५२ गुणांसह 'ए-प्लस प्लस' हे सर्वोच्च गुणांकन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** संशोधनातील कामगिरी, विद्यार्थीभिमुख आणि नावीन्यपूर्ण उपक्रम, आदी स्वरूपातील दर्जेदार, उल्लेखनीय कामगिरीच्या बळावर शिवाजी विद्यापीठाला राष्ट्रीय मूल्यांकन परिषदेकडून (नॅक) ३.५२ गुणांसह (सीजेपीए) 'ए-प्लस प्लस' मानांकन बुधवारी मिळाले. 'नॅक'च्या नव्या प्रक्रियेतील हे मानांकन राज्यामध्ये सर्वोच्च ठरले असून, त्याव्दारे विद्यापीठाने गुणवत्तेचा ठसा अधिक ठळकपणे राज्यासह राष्ट्रीय पातळीवर उमटविला आहे.

विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी यांच्यासह विद्यापीठाच्या सर्व घटकांच्या योगदानाचा या मानांकनाच्या यशामध्ये महत्त्वाचा वाटा आहे. या यशाने आम्हा सर्वांची जबाबदारी वाढली असून, यापुढे हे मानांकन वाढविण्यासाठी आम्ही सर्वजण कार्यरत राहणार असल्याची प्रतिक्रिया कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केली.

विद्यापीठाने २०१४ मध्ये 'अ' मानांकन मिळवून पुणे, मुंबईकडील गुणवत्तेच्या केंद्रबिंदूचा कोल्हापूरपर्यंत विस्तार केला. (पान १० वर)

### विद्यापीठ शंभर कोटींच्या अनुदानासाठी पात्र

सर्वांगीण विकासासाठी युजीसी, रुसाकडून दिल्या जाणाऱ्या शंभर कोटींच्या अनुदानासाठी या मानांकनामुळे विद्यापीठ पात्र ठरले आहे. 'ए-प्लस प्लस' मानांकनाच्या विद्यापीठातील विद्यार्थी म्हणून त्यांनाही संशोधन, शिक्षणाच्या विविध संधी उपलब्ध होणार आहेत.



नॅकच्या चौथ्या पुनर्मूल्यांकनामध्ये विद्यापीठाच्या 'ए-प्लस प्लस' या मानांकनापर्यंतच्या प्रवासात पहिले कुलगुरु डॉ. आप्पासाहेब पवार यांच्यापासून सर्व कुलगुरु आणि विद्यापीठाच्या प्रत्येक घटकाचे योगदान आहे. डॉ. माणिकराव साळुंखे यांनी नॅकची पायाभरणी केली. संख्यात्मक, गुणात्मक निकषांवर विद्यापीठाने आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे.

**- डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरु**

# शिवाजी विद्यापीठ राज्यात अव्वल



कोल्हापुरात बुधवारी शिवाजी विद्यापीठाला 'ए-प्लस प्लस' मानांकनाचा ई-मेल मिळाल्यानंतर कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन केले. यावेळी शेजारी व्ही. एन. शिंदे, एम. एस. देशमुख, आर. के. कामत, व्ही. एम. पाटील, क्रांतीकुमार पाटील, डी. जी. कणसे, व्ही. टी. पाटील, आदी उपस्थित होते.

(पान १ वरून) आता या मानांकनामध्ये वाढ करून शैक्षणिक गुणवत्ता पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे. मोहनलाल सुखाडिया विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. जे. पी. शर्मा यांच्या अध्यक्षतेखालील सहा सदस्य समितीने दि. १५ ते १७ मार्च या कालावधीत शिवाजी विद्यापीठाला भेट देऊन मूल्यांकन केले. या समितीने पाहणीचा अहवाल बेंगलोर येथील नॅकला सादर केला होता. त्यानंतर पुढील प्रक्रिया होऊन नॅकने मंगळवारी दुपारी पावणेएक वाजता विद्यापीठाचे मूल्यांकन जाहीर केले. त्यात विद्यापीठाला ३.५२ सीजीपीएससह 'ए-प्लस प्लस' असे मूल्यांकन मिळाले आहे. बदललेली प्रक्रिया, निकषांनुसार विद्यापीठ या मूल्यांकनाला सामोरे गेले. कोरोनामुळे एक वर्ष उशिरा मूल्यांकन झाले. आम्ही सर्वांनी एकजुटीने, सूक्ष्मनियोजन करून तयारी केली. त्यामुळे नवी प्रक्रिया असूनही विद्यापीठाला राज्यात सर्वोच्च मानांकन मिळाले आहे. त्यात अभ्यासक्रम, विद्यार्थी सुविधा, अध्ययन-अध्यापन, चांगले उपक्रम या निकषांमध्ये चांगले गुण मिळाले आहेत. हे यश विद्यापीठातील सर्व घटकांची ऊर्जा वाढविणारी आहे. 'एनआयआरएफ'मधील रँकिंग वाढविणे यापुढील आमचे ध्येय असल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख उपस्थित होते.

### शुभेच्छांचा वर्षाव

विद्यापीठाला ए-प्लस प्लस मानांकन मिळाल्याचे समजताच विद्यार्थी, प्राचार्य, शिक्षक, कर्मचारी यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी प्रत्यक्ष भेटून, दूरध्वनीवरून कुलगुरू, प्र-कुलगुरू, आदींवर शुभेच्छांचा वर्षाव केला.

## मूल्यांकन झालेले दुसरे विद्यापीठ

नॅकच्या नव्या प्रक्रियेनुसार राज्यातील अकृषी विद्यापीठांमध्ये पहिल्यांदा औरंगाबादमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे मूल्यांकन झाले. या विद्यापीठाला ३.२३ गुणांसह 'ए' मानांकन मिळाले. त्यानंतर शिवाजी विद्यापीठाचे मूल्यांकन झाले. आता नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठाचे मूल्यांकन होईल.

## निकषनिहाय मिळालेले गुण (चार पैकी)

अभ्यासक्रम : ४

अध्ययन-अध्यापन : ३.६१

संशोधन : ३.०९

पायाभूत सुविधा : ३.६५

विद्यार्थी सुविधा : ३.७९

प्रशासन : २.९५

चांगले उपक्रम : ३.८९

मानांकनाचा ई-मेल मिळाल्यानंतर कुलगुरू, प्र-कुलगुरू, कुलसचिव, आदींनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन केले. यावेळी क्रांतीकुमार पाटील, डी. जी. कणसे, व्ही. एम. पाटील, मंगलकुमार पाटील, आदी उपस्थित होते.

# अव्वल मानांकनाच्या सात संस्थांमध्ये शिवाजी विद्यापीठ

## देशात लौकिक : गुणवत्तेच्या बळावर सर्वोच्च मानांकन

**संतोष मिठारी**
लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** गुणवत्तेच्या बळावर शिवाजी विद्यापीठाने राष्ट्रीय मूल्यांकन परिषदेचे (नॅक) 'ए-प्लस प्लस' असे सर्वोच्च मानांकन मिळविले. त्यासह असे अव्वल मानांकन असलेली देशातील सात विद्यापीठे, शैक्षणिक संस्थांच्या यादीत स्थान मिळविणारे राज्यातील पहिले अकृषी विद्यापीठ होण्याचा बहुमान पटकाविला आहे. त्याद्वारे गुणवत्ता सिध्द करण्यासह कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्याचा लौकिक वाढविला आहे.

सन २००४ मध्ये तत्कालीन कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठ पहिल्यांदा नॅक मूल्यांकनाला सामोरे गेले. त्यात 'बी प्लस' मानांकन मिळाले. दुसऱ्या फेरीत २००९ मध्ये मानांकन घसरून 'बी'वर आले. तिसऱ्या फेरीची तयारी करून २०१४ मध्ये विद्यापीठाने 'ए' मानांकनाची कमाई करून, गुणवत्तेचा केंद्रबिंदू कोल्हापूरकडे आणला. आता चौथ्या फेरीत 'ए-प्लस प्लस' मानांकन मिळवून राज्यात अव्वल स्थान पटकाविले आहे. 'नॅक'ने गेल्या तीन वर्षांपासून नव्या निकषानुसार मानांकन सुरू केले. त्यात अभ्यासक्रम, अध्ययन-अध्यापन प्रणाली, संशोधन, नवनिर्मिती व विस्तार, पायाभूत सुविधा व अध्ययन स्रोत आदी निकषांद्वारे देशातील एकूण १४ विद्यापीठांचे, शैक्षणिक संस्थांचे मूल्यांकन केले आहे.



### शिलेदारांसह विविध घटक राबले

मूल्यांकनासाठी डॉ. आर. के. कामत, एम. एस. देशमुख, वैभव ढेरे, अभिजित रेडेकर, धैर्यशील यादव, एम. जे. पाटील, दीपक चव्हाण आदी शिलेदारांसह प्राध्यापक, कर्मचारी या विविध घटकांचे हात राबले. या घटकांचे टीमवर्क आणि योगदानामुळे चांगले मानांकन मिळाल्याचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले. एकजुटीने काम करण्याच्या प्रवृत्तीचे नॅक समितीने कौतुक केल्याचे त्यांनी सांगितले.

### 'ए-प्लस प्लस' मिळविणाऱ्या अन्य संस्था...

मदुराई कामराज विद्यापीठ, एसआरएम इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी (तामिळनाडू), बनस्थळी विद्यापीठ (राजस्थान), रामकृष्ण विवेकानंद एज्युकेशनइन्स्टिट्यूट (पश्चिम बंगाल), कोनेरू लक्ष्मय्याह फौंडेशन (आंध्र प्रदेश), इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स (कर्नाटक).

# विद्यापीठाला नॅकचे 'ए प्लस प्लस' मानांकन

## कुलगुरू शिर्के; 'एनआयआरएफ' मानांकनासाठी प्रयत्न

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ३१ : राष्ट्रीय मूल्यांकन तथा प्रत्यायन परिषद 'नॅक'च्या चौथ्या पुनर्मूल्यांकनामध्ये येथील शिवाजी विद्यापीठाने ३.५२ 'सीजीपीए' गुणांकनासह 'ए प्लस प्लस' मानांकन प्राप्त केले आहे. त्याचा फायदा संशोधक, विद्यार्थी, शिक्षकांबरोबरच संलग्नित महाविद्यालयांना होणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे पत्रकार परिषदेत दिली.

दरम्यान, 'नॅक'च्या बदललेल्या नव्या निकषांतर्गत गुणांकन करण्यात आलेले शिवाजी विद्यापीठ राज्यातील दुसरे विद्यापीठ आहे. प्रशासनाबाबत शिवाजी विद्यापीठाची एक स्वतःची अशी परंपरा आहे. प्रथम कुलगुरू डॉ. अप्पासाहेब पवारांपासून सर्वच कुलगुरूंनी त्याकामी योगदान दिलेले आहे. त्यांच्यासह सर्वच घटकांचे हे श्रेय असल्याचेही त्यांनी सांगितले.

ते म्हणाले, ''पुनर्मूल्यांकन फेरीअंतर्गत नॅक पिअर टीमने १५ ते १७ मार्च २०२१ या कालावधीत

**पान ११ वर »**



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाला 'नॅक'चे 'ए प्लस प्लस' मानांकन जाहीर झाल्यानंतर कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी बुधवारी प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन केले. शेजारी व्ही. टी. पाटील, प्रा. आर. के. कामत, प्रा. एम. एस. देशमुख, प्राचार्य क्रांतिकुमार पाटील, प्राचार्य डी. जी. कणसे, प्राचार्य व्ही. एम. पाटील, प्राचार्य मंगलकुमार पाटील, प्रा. व्ही. एस. मन्ने आदी.**

### असे झाले मूल्यांकन

एकूण सात निकषांवर मूल्यांकन झाले. त्यात अभ्यासक्रम, अध्ययन-अध्यापन प्रणाली, संशोधन- नवनिर्मिती व विस्तार, पायाभूत सुविधा व अध्ययन स्रोत, विद्यार्थी सहायता व प्रगती, प्रशासन- नेतृत्व व व्यवस्थापन आणि संस्थात्मक मूल्ये व वेगळे उपक्रम या निकषांचा समावेश होता. अभ्यासक्रमांसाठी सर्वाधिक चार 'सीजीपीए' गुण तर त्या खालोखाल संस्थात्मक मूल्ये व वेगळ्या उपक्रमांसाठी ३.८९ गुण मिळाले आहेत. विद्यार्थी सहायता व प्रगतीसाठी ३.७९, तर पायाभूत सुविधा व अध्ययन स्रोतांसाठी ३.६५ इतके गुण मिळाले आहेत.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाला 'नॅक'चे 'ए प्लस प्लस' मानांकन जाहीर झाल्यानंतर कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी बुधवारी प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन केले. शेजारी व्ही. टी. पाटील, प्रा. आर. के. कामत, प्रा. एम. एस. देशमुख, प्राचार्य क्रांतिकुमार पाटील, प्राचार्य डी. जी. कणसे, प्राचार्य व्ही. एम. पाटील, प्राचार्य मंगलकुमार पाटील, प्रा. व्ही. एस. मन्ने आदी.

# विद्यापीठाला नॅकचे 'ए प्लस प्लस' मानांकन

» पान १ वरून

डॉ. एम. एस. देशमुख, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर उपस्थित होते. प्रा. आर. के. कामत यांनी 'नॅक'च्या प्रक्रियेविषयी सविस्तर माहिती दिली.

**शिवाजी महाराजांना अभिवादन**

मानांकन मिळाल्याची माहिती दुपारी दोनच्या सुमारास समजताच कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह सर्वच अधिकाऱ्यांनी विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीसमोरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन केले.

**प्रत्यक्ष भेटी टाळण्याचे आवाहन**

'नॅक'च्या मानांकनामुळे सर्वांनाच आनंद झाला आहे; पण कोरोनाच्या पार्श्वभूमीवर दूरध्वनी, ई-मेलद्वारे अभिनंदन करावे. प्रत्यक्ष भेटूनच अभिनंदन करण्याची जोखीम टाळावी, असे आवाहनही कुलगुरू डॉ. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी केले आहे.

# शिवाजी विद्यापीठास 'नॅक'चे 'A++' मानांकन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्रीय मूल्यांकन प्रत्यायन परिषदेच्या (नॅक) वतीने शिवाजी विद्यापीठास बुधवारी 'A++' मानांकन जाहीर करण्यात आले. या मानांकनामुळे कोल्हापूरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेल्याची भावना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केली. विद्यापीठास ४ पैकी ३.५२ गुण मिळाले असून, नव्या 'नॅक'च्या निकषात 'A++' मानांकन मिळालेले

## कोल्हापूरच्या शिरपेचात मानाचा तुरा

शिवाजी विद्यापीठ हे राज्यातील एकमेव विद्यापीठ असल्याचा दावा डॉ. शिर्के यांनी केला.

डॉ. शिर्के म्हणाले, १५ ते १७ मार्च या कालावधीत 'नॅक' बंगळूरच्या पिअर टीमने विद्यापीठाचे मूल्यांकन केले. प्रा. जे. पी. शर्मा अध्यक्ष असलेल्या या कमिटीत प्रा. बी. आर. कौशल, प्रा. एस. ए. एच.

पान ४ वर ▸

# शिवाजी विद्यापीठास 'नॅक'चे 'A++' मानांकन

(पान १ वरून) मोईनुद्दिन, प्रा. तरुण अरोरा, प्रा. सुनील कुमार व प्रा. हरिश चंद्रा दास सदस्य होते. 'नॅक'च्या नवीन निकषाप्रमाणे ७० टक्के

संख्यात्मक माहिती अगोदरच 'नॅक'ला ऑनलाईन सादर केली होती. ३० टक्के गुणांसाठी 'नॅक' समितीने विद्यापीठाला प्रत्यक्ष भेट दिली. विद्यापीठातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, अभ्यासक्रम, अध्ययन, अध्यापन, संशोधनाचा दर्जा, अतिउच्च पातळीची माहिती समितीने घेतली. कुलगुरू, प्रशासकीय अधिकारी, प्राध्यापक, आजी-माजी विद्यार्थी, कर्मचारी यांच्याशी चर्चा केली. समितीने बहुतेक विभागांना भेटी देऊन तेथील संशोधनाची माहिती घेतली. तीन दिवसांनंतर समितीने आपला अहवाल तयार करून तो 'नॅक' समितीला सादर केला.

विद्यापीठातील प्रशासकीय कामकाजावर समिती खूश झाली. त्यांनी रेन वॉटर हार्वेस्टिंग, कमवा-शिका योजनेचे विशेष कौतुक केले. महापुराच्या काळात विद्यापीठाने सामाजिक बांधिलकी जपत केलेल्या मदतकार्याची दखलही घेतली. कोरोना काळातही विद्यापीठातील सर्व कर्मचारी व अधिकाऱ्यांनी एकजुटीने काम केले त्याचे हे यश आहे. यामुळे विद्यापीठाच्या गुणवत्तेची ही पोचपावती असून, हे मानांकन सर्वांना ऊर्जा देणारे आहे, असे डॉ. शिर्के म्हणाले.

पत्रकार परिषदेला प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त अधिकारी व्ही. टी. पाटील, डॉ. एम. एस. देशमुख, प्रा. आर. के. कामत उपस्थित होते.

**...या निकषांवर झाली तपासणी**

अभ्यासक्रम, अध्ययन, अध्यापन, संशोधन, नवनिर्मिती व विस्तार, पायाभूत सुविधा, अध्ययन स्रोत, विद्यार्थी सहाय्यता व प्रगती, प्रशासन, नेतृत्व व व्यवस्थापन, संस्थात्मक मूल्ये, वेगळे उपक्रम या निकषांत विद्यापीठाने चमकदार कामगिरी केली आहे. समितीने अपुरा कर्मचारीवर्ग वगळता अन्य कोणत्याही त्रुटी काढल्या नाहीत.

**...अशी होती कोअर टीम**

'नॅक' समितीसाठी विद्यापीठ प्रशासनाने जय्यत तयारी केली होती. विद्यापीठाच्या गुणवत्ता हमी कक्षात १३८ फाईल तयार केल्या होत्या. समिती सदस्यांनी यातील फाईल चाळून दिलेल्या माहितीची पडताळणी केली. या कक्षाचे प्रमुख म्हणून प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी काम पाहिले. तर एकूणच विद्यापीठाचे उपक्रम व योजना, संशोधनाची माहिती पीपीटीच्या माध्यमातून समितीसमोर मांडण्याचे काम डॉ. आर. के. कामत यांनी केले. कुलगुरू डॉ. शिर्के, प्र-कुलगुरू पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष कार्यरत होते. त्यांच्यासोबत डॉ. वैभव ढेरे, अभिजित रेडेकर यांनीही विशेष परिश्रम घेतले.

**'हे' मानांकन ऊर्जा**



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठास 'नॅक'चे 'A++' मानांकन जाहीर झाल्यानंतर कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास अभिवादन केले. यावेळी व्ही. टी. पाटील, प्रा. आर. के. कामत, प्रा. एम. एस. देशमुख, प्राचार्य क्रांतिकुमार पाटील, प्राचार्य डी. जी. कणसे आदी उपस्थित होते. (छाया : पप्पू अत्तार)**

**देणारे : डॉ. शिर्के**

शिवाजी विद्यापीठाने 'बी' मानांकनापासून 'ए प्लस प्लस'पर्यंतचा प्रवास केला आहे. संख्यात्मक आणि गुणात्मक अशा दोन्ही निकषांवर विद्यापीठाने आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. विशेषतः, नॅक पिअर टीमने त्यांच्या एक्झिट मिटिंगमध्ये शिवाजी विद्यापीठामधील एकजुटीने आणि एकदिलाने काम करण्याच्या प्रवृत्तीचे खुल्या मनाने कौतुक केले. संलग्नित महाविद्यालयांनासुद्धा त्याचा लाभ होणार आहे. त्यामुळे विद्यापीठ परिक्षेत्रातच नव्हे, तर देशभरातील विद्यापीठाशी संबंधित सर्व घटकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. काम करणाऱ्या सर्वांमध्ये नवी ऊर्जा संचारली आहे, असे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा

## ‘3.52 सीजीपीए’ गुणांकनासह NACC चे A++ मानांकन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

राष्ट्रीय मूल्यांकन तथा प्रत्यायन परिषद (नॅक)चे शिवाजी विद्यापीठाला ‘३.५२ सीजीपीएमसह ए प्लस प्लस’ मानांकन मिळाले असून, याद्वारे विद्यापीठाची शैक्षणिक गुणवत्ता पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी पत्रकार परिषदेत दिली. दरम्यान, नॅकच्या ए प्लस प्लस मानांकनामुळे विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, व्ही. टी. पाटील, आर. के. कामत, एम. एस. देशमुख उपस्थित होते.

कुलगुरू शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठात दि. १५ ते १७ मार्चदरम्यान नॅकची बेंगलोर येथील पिअर टीम मूल्यांकनासाठी आली होती. यामध्ये अध्यक्ष जे. पी. शर्मा यांच्यासह सहा सदस्यांचा समावेश होता. मूल्यांकनामधील ७० टक्के गुणांसाठीची संख्यात्मक माहिती नॅकला कळवण्यात आली



होती, तर उर्वरित ३० टक्के गुणांसाठी नॅक समितीकडून विद्यापीठात पाहणी करण्यात आली. यामध्ये कुलगुरूंचे सादरीकरण, अधिविभागास भेट, आजी-माजी विद्यार्थ्यांशी चर्चा, अभ्यासक्रम, विद्यापीठ योजना, संशोधनाबाबत माहिती याद्वारे समितीकडून विद्यापीठाच्या कामकाजाची माहिती संकलित करण्यात आली. याबाबतचा सर्व अहवाल समितीने बेंगलोर नॅकला सादर केला. त्यानंतरची सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यावर नॅकने विद्यापीठाला ए प्लस प्लस मानांकन मिळाल्याचे बुधवारी घोषित केले. विद्यापीठाने मिळवलेल्या या यशामध्ये विद्यापीठ प्रशासन, प्राध्यापक, अधिकारी तसेच विद्यार्थी ▶▶ पान ९ वर..

## नॅकची वार्ता कळताच शिवरायांना अभिवादन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाला नॅकचे ए प्लस प्लस मानांकन मिळाल्याची माहिती बुधवारी दुपारी समजताच कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह सर्वच अधिकाऱ्यांनी मुख्य प्रशासकीय इमारतीसमोरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्प वाहून अभिवादन केले.

विविध बैठकांच्या निमित्ताने विद्यापीठात आलेले व्यवस्थापन परिषदेचे सदस्य, अधिसभेचे सदस्य, प्राचार्य आणि शिक्षक यांनीही तेथे कुलगुरू डॉ. शिर्के यांची भेट घेऊन त्यांचे अभिनंदन केले. विविध अधिविभागांचे प्रमुख व शिक्षकांनीही कुलगुरूंसह सर्व अधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. कुलगुरूंनी त्यानंतर मुख्य प्रशासकीय इमारतीमधील प्रत्येक विभागात जाऊन नॅकसाठी परिश्रम ▶▶ पान ९ वर..

# शिवाजी विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा

या प्रत्येकाचा मोलाचा सहभाग आहे.

जबाबदारी वाढली : नॅकचे ए प्लस-प्लस मानांकन मिळाल्याने शिवाजी विद्यापीठाची जबाबदारी वाढली असून, यापुढे हा दर्जा कायम ठेवत विद्यापीठ पुढचा टप्पा गाठणार आहे, असे प्रतिपादन कुलगुरू शिर्के यांनी पत्रकार परिषदेदरम्यान केले. ते म्हणाले, नॅक मानांकन हा बेंचमार्क असून आम्ही येत्या काळात अभ्यासक्रम, परदेशी विद्यार्थी संख्या वाढ, पेटंट, संशोधन यामध्येही नक्कीच प्रगती करू.

डी. टी. शिर्के : बी. एम. हिर्डेकर यांच्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन

# ‘ऋतुरंग’मध्ये मानवी मूल्यांचे प्रतिबिंब

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** ‘ऋतुरंग’ हा काव्यसंग्रह मानवी मूल्यांचे प्रतिबिंब आहे. जीवनाच्या विविध अंगांना स्पर्श करणाऱ्या कविता त्यामध्ये आहेत, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी मंगळवारी केले.

येथील ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. बी. एम. हिर्डेकर यांनी लिहिलेल्या ‘ऋतुरंग’ या काव्यसंग्रहाच्या प्रकाशनावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे, तर विद्यापीठातील मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे, राजाराम महाविद्यालयातील इंग्रजी अधिविभागप्रमुख डॉ. रघुनाथ कडाकणे प्रमुख उपस्थित होते.

मूल्ये, न्यायासाठी डॉ. हिर्डेकर यांनी केलेला संघर्ष मी पाहिलेला आहे. ‘ऋतुरंग’ हा त्यांचे काव्यात्मक आत्मचरित्र आहे. त्यातून त्यांनी माणसाची खरी ओळख करून दिली असल्याचे डॉ. लवटे यांनी सांगितले.



कोल्हापुरात मंगळवारी ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. बी. एम. हिर्डेकर यांच्या ‘ऋतुरंग’ काव्यसंग्रहाचे प्रकाशन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याहस्ते झाले. यावेळी डावीकडून बी. एम. हिर्डेकर, रणधीर शिंदे, सुनीलकुमार लवटे, रघुनाथ कडाकणे, प्रवीण चौगुले उपस्थित होते. (छाया : नसीर अत्तार)

# ‘शिक्षणशास्त्र’चे अर्ज भरण्यास मुदतवाढ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाने शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष, सत्राच्या परीक्षेचे अर्ज भरण्यास दि. ७ एप्रिलपर्यंत मुदतवाढ दिली आहे. या अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया विलंबाने सुरू झाली. त्यामुळे परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्याचा निर्णय परीक्षा व मूल्यमापन मंडळाने घेतला आहे.

01 APR 2021

जनसंपर्क कक्ष

तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'ए प्लस प्लस' मानांकनासह विद्यापीठ राज्यात प्रथम



- नॅक बेंगळूरची बुधवारी घोषणा
- कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांची माहिती
- विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा
- प्रशासनावर शुभेच्छांचा वर्षाव

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

राष्ट्रीय मूल्यांकन तथा प्रत्यायन परिषदेचे (नॅक) शिवाजी विद्यापीठाला ४ पैकी ३.५२ सीजीपीएसह 'ए प्लस प्लस मानांकन' मिळाले आहे. नॅक बेंगळूरने ही घोषणा बुधवारी केली. नवीन नॅक मूल्यांकनाच्या पद्धतीत विद्यापीठ राज्यात अव्वल आल्याने विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. या मूल्यांकनाच्या माध्यमातून विद्यापीठाने पुन्हा एकदा शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध केली आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, नॅक पिअर कमिटीचे अध्यक्ष प्रा. जे. पी. शर्मा यांच्यासह सदस्य प्रा. बी. आर. कौशल, प्रा. एस. ए. एच. मोईनुद्दिन, प्रा. तरुण अरोरा, प्रा. सुनील कुमार व प्रा. हरिशचंद्रा दास यांनी १५ ते १७ मार्च दरम्यान विद्यापीठाचे नॅक मूल्यांकन पूर्ण केले.



डॉ. डी. टी. शिर्के

७० टक्के संख्यात्मक माहिती अगोदरच नॅकला ऑनलाईन सादर केली होती. ३० टक्के गुणांसाठी प्रत्यक्ष पाहणी, चर्चा करून कुलगुरू, प्रशासकीय अधिकारी, प्राध्यापक, आजी–माजी विद्यार्थी, कर्मचारी यांचे पॉवरपॉईंट प्रेझेंटेशन, चर्चा, प्रत्यक्ष पाहणी केली. या कमिटीने विद्यापीठातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, अभ्यासक्रम,

पान ६ पहा

# 'ए प्लस प्लस' मानांकनासह विद्यापीठ राज्यात प्रथम

पान १ वरून

अध्ययन, अध्यापन, संशोधनाचा दर्जा, बेस्ट प्रॅक्टीसेसमध्ये कमवा व शिका योजना, पाणी व्यवस्थापन, सामाजिक जबाबदारी, जैवविविधता याचे विशेष कौतुक केले. नॅक मूल्यांकनाचा अहवाल नॅक बेंगळूर कार्यालयाला सादर केल्यानंतर पुढील प्रक्रिया पूर्ण करून नॅक बेंगळूरने बुधवारी ३.५२ सीजीपीएसह 'ए प्लस प्लस' मानांकनाची घोषणा केली. गेल्या सहा महिन्यांपासून महाविद्यालय, विविध अधिकार मंडळ, प्रशासकीय अधिकारी, प्राध्यापक, कर्मचारी, आजी–माजी विद्यार्थी यांनी एकजुटीने केलेल्या कामाला यश मिळाले. ऐवढ्यावरच न थांबता हे यश कायमस्वरूपी टिकवत, पुढील मूल्यांकनासाठी तयारी सुरू करणार आहे. यावेळी प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, डॉ. आर. के. कामत, आयक्यूएसीचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख, डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. अलोक जत्राटकर आदी उपस्थित होते.

**आतापर्यंतच्या १३ कुलगुरूंचा कार्याला यश**

विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्यापासून आतापर्यंतच्या १३ कुलगुरुंनी केलेल्या कार्याला यश मिळाले आहे. प्रत्येकांनी आपआपल्या कालावधीत विद्यापीठाच्या प्रगतीसाठी उत्तुंग कार्य केले आहे. तसेच विद्यापीठाशी निगडीत प्रत्येक घटकाचा या यशात मोलाचा वाटा आहे. एकजुटीने केलेल्या कामाला यश आल्याचा आनंद आहे.

**कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के (शिवाजी विद्यापीठ)**

**रूसाच्या अनुदानाचा मार्ग मोकळा**

रूसा अंतर्गत विद्यापीठाला यापुर्वी २४ कोटींचे अनुदान मिळाले आहे. आता नॅकचे 'ए प्लस प्लस' मानांकन मिळाल्याने भविष्यात रूसाकडे १०० कोटींच्या अनुदानाचा प्रस्ताव पाठवण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. विद्यापीठाला जास्तीत जास्त अनुदान मिळाले तर विद्यापीठाच्या प्रगतीचा आलेख वाढेल.

**एनआयआरएफ मूल्यांकनाची तयारी सुरू**

शैक्षणिक वर्ष २०२२ च्या एनआयआरएफच्या मूल्यांकनात अव्वल येण्याचा ॲक्शन प्लॅन तयार करण्याचे काम सुरू आहे. त्यादृष्टीने विद्यापीठात तयारी सुरू असून एप्रिल महिन्यात प्रत्यक्ष कामाला सुरूवात करणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 APR 2021
तरुण भारत

थोडक्यात महत्त्वाचे

# शिवाजी विद्यापीठाची ऑनलाईन परीक्षा सुरळीत

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२०-२१ मधील काही अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. बुधवारी ५६५८ पैकी ५२०९ विद्यार्थ्यांनी ऑनलाईन तर ४४९ विद्यार्थ्यांनी ऑफलाईन परीक्षा दिली. सर्व विषयांच्या परीक्षा सुरळीत पार पडल्या आहेत. बी. एस्सी. आयटी, बी. कॉम. बँक मॅनेजमेंट, बी.एस्सी-बायोटेक, बी. एस्सी.- आयटी, बी.एस्सी.-शुगर टेक., बी. एस्सी.- ॲनिमेशन, बी. एस्सी.- फॉरेन्सीक सायन्स., बी. एस्सी.- फुड प्रोसेसिंग ॲन्ड पॅक., बी. एस्सी.-कॉम्प्युटर सायन्स, बीएससी, बी.बी. ए., बी. सी. ए., बी. एस. डब्ल्यू, बी. आय. डी., बी. डी. एफ. सी., बी. एफ. टी. एम., बी. व्होक इत्यादी अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरळीत पार पडल्या, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक गजानन पळसे यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
01 APR 2021
तरुण भारत

# शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाचे परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ

**कोल्हापूर :** शैक्षणिक वर्ष २०२०-२१ वर्षातील हिवाळी सत्रातील शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमाचे परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे. विनाविलंब शुल्कासह परीक्षा अर्ज भरण्यास ७ एप्रिलपर्यंत मुदत आहे. तरी प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी प्रथम सत्रासाठी परीक्षा अर्ज भरून महाविद्यालय, अधिविभागात सादर करावे. याची नोंद महाविद्यालय, विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन प्री-एक्झाम उपकुलसचिव निवास माने यांनी केले आहे.